आतील पानावर...
गृहिणींसाठी बहूपयोगी
स्मार्ट होम
मंथली प्लॅनर

# बिइंग वुमन

Pune's only Fortnightly for Women

६ जानेवारी – राष्ट्रीय पत्रकार दिन
१० जानेवारी – जागतिक हास्य दिन
१० जानेवारी – विश्व हिंदी दिवस
१२ जानेवारी – राष्ट्रीय युवक दिन
१४ जानेवारी – राष्ट्रीय भूगोल दिन
१५ जानेवारी – भारतीय सैन्य दिवस

Price Rs. 18/- Pages 4 RNI No. MAHMAR/2019/78753 | Pune - Year 3, Issue 3 - 1 to 15 January 2022 (Fortnightly)



**Introducing**
**POTLI MASSAGE**

Potli massage is done with the help of potli, small heated herbal pouches. The pouch has dried and fresh Ayurvedic herbs and are picked according to the problem one is being treated for.

LeMiroir Salon & Spa, Mayur Colony Corner, Above Maharashtra Bank, Kothrud, Pune.

Four Fountains™ DE-STRESS SPA

+91 - 8448449706 / 8983012212

# संकल्प नववर्षाचे



**पूजा देसाई वाघ, पुणे**
editorial@thebeingwoman.com

जानेवारी महिना आपल्याला स्वप्नं दाखवतो तर डिसेंबर महिना वास्तवाची जाणीव!

नवीन वर्ष जवळ यायला लागले की सगळीकडे नवीन संकल्पांचे वारे वहायला लागतात. जुन्याच संकल्पांवरची धूळ झटकून त्यांना नव्या अवतारात पुन्हा जोमाने आणले जाते. एक तारखेपासून व्यायाम चालू करणार, व्यसने सोडणार, जोरात अभ्यास करणार, कामात जास्त लक्ष देणार यासारख्या 'क्लिशेड' संकल्पांपासून ते आवडत्या मुलीला प्रपोज करणार, आवडत्या ठिकाणी फिरायला जाणार, एखादा छंद जोपासणार इतकी याची रेंज असते. जिम्सच्या, डायटीशीयन्सच्या बिझनेसचा पिक पिरियडही हाच.



आता तर या संकल्पांचा फोलपणा इतका जाणवू लागलाय की साधारण डिसेंबर महिना चालू झाला की सोशल मीडिया, मित्रांच्या कट्ट्यावर याविषयीचे जोक्स, मिम्स व्हायरल व्हायला सुरुवात होते. चेष्टेने एकमेकांना मग, 'यावर्षीचे काय नवीन संकल्प?' असे विचारले जाते. पण गेली दोन वर्षे संपूर्ण जगाने न भूतो आणि भविष्यती तर नकोच असे रोगाचे थैमान बघीतले. करोडो लोक यात होरपळून निघाले, मृत्युमुखी पडले पण यात एक गोष्ट मात्र जगभर स्पष्ट झाली की ज्यांची मुळातच तब्येत चांगली आहे ते तरून गेले. स्वतःला फिट ठेवणे ही आता काळाची गरज बनली आहे. फक्त शरीर नाही तर त्याचबरोबर मानसिक स्वास्थ्यही टिकवून ठेवायला हवे ही जाणीवही हळूहळू होते आहे.

काही दिवसांपूर्वी अमेरिकेतील एका सामाजिक संस्थेने केलेला एक सर्वे वाचनात आला. यात '२०२२ साठी तुमचा काय संकल्प आहे?' हा प्रश्न विचारला गेला होता. त्या सर्वेनुसार साधारण ७५% लोकांचे उत्तर हे 'तब्येत उत्तम ठेवणार, इम्युनिटी वाढवणार' असेच होते. त्या खालोखाल मानसिक स्वास्थ्य टिकवून ठेवणार, त्यासाठी संगीत, ध्यान याचा उपयोग करणार, नात्यांना वेळ देणार, आवडत्या गोष्टी करणार हीच उत्तरे होती.

हेच आपल्या सर्वांना लागू होतंय. हेच आता आपले संकल्प असले पाहिजेत. इथून पुढे अनेक नवनवीन रोग जगाला हैराण करतील. लॉकडाऊन, क्वारंटाईन ही कायमस्वरूपी उपाययोजना होऊच शकत नाही. आपल्यालाच आपली काळजी घेऊन स्वतःवर काम करायची वेळ आली आहे. 'सर सलामत तो पगडी पचास!'

स्वतःची तब्येत सुधारणे, त्यासाठी व्यायाम, योग्य आहार, बॅलन्स्ड जीवनपद्धती अवलंबली पाहिजे. मनाच्या आरोग्याकडे आपल्या देशात अजूनही डोळेझाक केली जाते. त्याला गांभीर्याने घेतले पाहिजे. मन आनंदी तर दुनिया आनंदी. तरुण पिढीने हे संकल्प केले, ते फक्त नवीन वर्षाच्या सुरुवातीला नाही तर कायमचे फॉलो केले तर माझ्या मते कोणतेही पँडेमिक देशाचे फार काही वाकडे करू शकत नाही.

माझे संकल्प तर ठरले आहेत आणि तुमचे? तुम्हा सर्वांना नवीन वर्षाच्या मनापासून भरभरून शुभेच्छा! आरोग्य, समाधान, आनंद तुम्हाला याच नाही तर पुढील असंख्य वर्षे लाभत राहो!

# राष्ट्रीय भूगोल दिनाच्या निमित्ताने...



**शुभांगी नांदुरकर, पुणे**
editorial@thebeingwoman.com



भूगोल... शालेय जीवनातील बहुतेकांचा नावडता विषय, मात्र तेवढाच उत्साहवर्धक विषय. या भूगोलाच्या विषयी जनसामान्यात असणारी भीती दूर व्हावी, त्याचे महत्व लोकांना समजावे, या उद्देशाने भारत सरकारकडून साजरा करण्यात येणारा दिवस म्हणजे 'राष्ट्रीय भूगोल दिन'. मकर संक्रातीला अर्थात १४ जानेवारीला हा दिवस साजरा करण्यात येतो. सूर्याचे उत्तर गोलार्धातून दक्षिण गोलार्धात भ्रमण सुरु होते म्हणून भारतीय पंचागात संक्रातीला अतिशय महत्त्व आहे.

भूगोल मानवी आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. रोजच्या जीवनातील अनेक बाबी या भूगोलाशी संबंधित आहेत. मकर संक्रांत हा सण तर त्याचेच एक प्रातिनिधिक स्वरूप.

भूगोलाच्या विविध शाखा आहेत. जसे राजकीय भूगोल, वस्ती भूगोल, हवामानशास्त्र, आर्थिक भूगोल, लष्करी भूगोल वगैरे. मात्र शालेय अभ्यासक्रमात फक्त राजकीय भूगोलाचाच विचार करण्यात येतो. त्यामुळे अत्यंत रंजक असणारा भूगोल विषय कंटाळवाणा होतो आणि भूगोलाशी असणारा संपर्क तुटतो. छत्रपती शिवाजी महाराज यांची युद्धनीती लष्करी भूगोलावर आधारीत होती. आपले राजस्थानी आणि गुजराती बांधव पिढीजात व्यवसाय करू शकतात. याची कारणे तेथील भौगोलिक परिस्थीतीशी परिणाम साधणारी आहेत. आपल्याकडे हिवाळ्यात उत्तर गोलार्धातून स्थलांतरीत पक्षी येतात. याचे कारणसुद्धा भूगोलाशी संबंधित आहे. सध्या आपण अत्यंत विषम परिस्थीती अनुभवतो आहोत याचासुध्दा अभ्यास भूगोलात करण्यात येतो. कोकणातील घरे उतरत्या छपराची असतात यामागेसुद्धा भूगोलच कारणीभूत असतो. सध्या रस्त्याने जाताना आपणास ठीकठिकाणी रस्त्याची मोजणी करताना दिसतात. तोसुद्धा भूगोलाचा विद्यार्थी असतो. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून नागरी सेवेशिवाय ज्या परीक्षा घेतल्या जातात, त्यामध्ये भूगोल विषयातील पदव्युत्तर शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी एक परीक्षा घेतली जाते.

भूगोल विषय आवडता होण्यासाठी एक घटक म्हणजे त्याची परिभाषा समजून घेणे आवश्यक आहे. आजचे गुगल मॅप्स हे भूगोलाशी निगडीत ऍप कितीतरी समस्यांची उकल करते. पत्ता शोधण्यापासून कार ड्रायव्हर्स, डिलिव्हरी बॉईज अशांसह अनेकांना हे ऍप म्हणजे देवदूतच ठरले आहे, नाही का?

**बिइंग वुमन**
**वार्षिक वर्गणी रू. ५२५/-**
* दिवाळी अंकासह २४ अंक घरपोहोच
* प्रत्येक वर्गणीदारास एक आकर्षक वेलकम गिफ्ट

*** सिल्वर क्लब ग्रुप -**
**दहा सदस्य बुकिंगसाठी रू. ४७५/- प्रत्येकी**
एकूण रू. ४७५०/-
* दहा सदस्यांना एकाच पत्त्यावर अंक मिळतील

*** गोल्ड क्लब ग्रुप -**
**२५ किंवा त्यापेक्षा अधिक सदस्यांना रू. ४००/- प्रत्येकी**
एकूण रू. १००००/-
* २५ सदस्यांना दोन पत्त्यावर अंक मिळतील

वर्गणीदार होण्यासाठी संपर्क :- ९८२२८६२२५५, ८५५२८५७७७९




Dreaming
of
Destination Wedding
Now in
Prathamesh Resorts
Khed Shivapur, Salavade

BREATHE | RELAX | ENJOY
9699681515
Package Starting @
99,999/- T&C



Wedding Venue | Corporate Events | Banquet Hall
Garden Lawn | Resorts | Swimming Pool
1 Day Trip | Night Stay | Adventure Park

www.prathameshresorts.com

बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women

## थोडक्यात...



**रोहिणी वांजपे,** संपादक - बिइंग वुमन
editorial@thebeingwoman.com

नमस्कार! सर्वांना नवीन वर्षाच्या खूप शुभेच्छा. नव्याने सुरू झालेले २०२२ साल तुमच्या आयुष्यात खूप आनंद, समृद्धी, आरोग्य घेऊन येवो. या अंकाबरोबर वाचकांना एक अभिनव भेट मिळेल, ती म्हणजे Annual Planner. नवीन टेक्नॉलॉजीमध्ये सगळे planner आपल्या फोनमध्ये असतात पण समोर असलेल्या या प्लॅनरमध्ये २०२२ च्या प्रत्येक महिन्याच्या खर्चाच्या नोंदी यामध्ये करू शकता. महत्वाचे फोन नंबर आणि वाढदिवस याच्याही नोंदी करू शकता. वर्ष २०२१ मधील 'बिइंग वुमन'ची वाटचाल बघितली तर असे वाटते, हे तर आपण ठरवलेच नव्हते. मागच्या जानेवारीपासून अनेक गोष्टी घडत गेल्या आणि त्या जशा आल्या तशा आम्ही स्वीकारत गेलो. आज मागे वळून पाहतांना, 'बिइंग वुमन'ची गेल्या वर्षातली यशस्वी वाटचाल नजरेस येते.

जानेवारी २०20 मध्ये एक अनोखी स्पर्धा घेतली होती. 'बायकोवर बोलू काही...' या स्पर्धेला मिळालेला प्रतिसाद हा सर्व वयाच्या नवऱ्यांचा होता. त्यावेळी झालेल्या बक्षीस समारंभाला मुख्य पाहुण्या गौरी कानिटकर, प्राजक्ता कोळपकर, स्वाती यादव होत्या. समारंभाला १०० जण उपस्थित होते. विजेत्या जोडप्यांनी आपापले अनुभव सांगितले.

बावधन इथे झालेल्या प्रदर्शनात 'बिइंग वुमन'चा स्टॉल होता. लॉकडाऊननंतरचे हे पहिलेच प्रदर्शन होते. यामुळे बावधनमध्ये सगळीकडे 'बिइंग वुमन'चा अंक पोहोचला. नंतर लॉकडाऊनमुळे मार्च ते ऑगस्टपर्यंत डिजिटल अंकच प्रसिद्ध झाले. १५ ऑगस्टच्या अंकात 'माझ्या कल्पनेतील स्वातंत्र्यदिन कसा असेल?' याबद्दल मान्यवरांनी विचार प्रकट केले.

ऑक्टोबरमध्ये एक वेगळीच संधी चालून आली. माजी आमदार सौ. मेधाताई कुलकर्णी यांनी 'हातमाग दिनानिमित्त' 'धागा हॅन्डलूम महोत्सव' आयोजित केला आणि त्यात 'बिइंग वुमन'ला फॅशन शो करायची संधी दिली. यात १२ प्रकारच्या हॅन्डलूम कापडाचे सुंदर ड्रेसेस मनिषा महाजन हिने तयार केले होते. या फॅशन शो चे खूप कौतुक झाले. आणखी एका अनोख्या फॅशन शो बरोबर 'बिइंग वुमन' आयोजक होते. ते म्हणजे तृतीयपंथी लोकांचा फॅशन शो. पृथ्वी, अग्नी, वायू अशा १२ निसर्गतत्वांचे ड्रेसेस यात होते.

या वर्षीचा अजून एक उपक्रम म्हणजे, 'कारवाँ' हे महिला उत्पादकांनी भाग घेतलेले प्रदर्शन. अतिशय वेगवेगळ्या वस्तूंचे असे हे प्रदर्शन 'बिइंग वुमन'ने 'अद्विता' या संस्थेबरोबर आयोजित केले होते. दोन दिवसांच्या या प्रदर्शनात सर्व व्यावसायिकांच्या मालाची खूप विक्री झाली. याचवेळी बिइंग वुमनच्या 'शुभमंगल विशेषांकाला' खूप प्रतिसाद मिळाला.

असे हे २०२१ वर्ष 'बिइंग वुमन' करिता वेगवगळ्या घटनांनी अनपेक्षित आणि अनुकूल असा प्रतिसाद मिळालेले होते. म्हणूनच मला वाटते की कोणतेही संकल्प न करता आलेले हे अनुभव आनंददायकच होते. पुढील वर्षासाठी महिला उद्योजकांसाठी काही प्रोग्रॅम, प्रदर्शने, स्पर्धा अशा विविध गोष्टी करायचे ठरवले आहे. यासाठी अनेक संस्था सोबत आहेत. त्यामुळे पुढील वर्ष हे 'बिइंग वुमन' चे happening वर्ष असेल हे नक्की. पुन्हा एकदा नवीन वर्षाच्या आणि त्याबरोबरच येणाऱ्या संक्रांतीच्या सणासाठी शुभेच्छा.

•••

### वाचक-मानस...

**गेल्या दोन वर्षात लोकप्रियतेत वाढ झालेल्या, महिलांनी महिलांसाठी चालवलेल्या 'बिइंग वुमन' या पाक्षिकासाठी केवळ लेखक-लेखिका लिहू शकतात असे नाही; तर आता प्रत्येक अंकामध्ये वाचकांच्या प्रतिक्रियांना आम्ही स्थान देणार आहोत. आपली प्रत्येक अंकाबद्दलची प्रतिक्रिया १०० शब्दांमध्ये आपल्या फोटोसह 'बिइंग वुमन' च्या मेल आयडीवर अवश्य पाठवा. editorial@thebeingwoman.com**

## पुराणातील स्त्रिया



**कुंदा कुलकर्णी ग्रामोपाध्ये, पुणे**
editorial@thebeingwoman.com

# ऋषिका जुहू

वैदिक काळामध्ये लोपामुद्रा, आदिती, विश्वावरा, इंद्राणी, सर्परागिणी, शाश्वती अशा अनेक ऋषिका होऊन गेल्या. वेदांच्या स्तोत्रांच्या किंवा मंत्रांच्या जाणकार, त्यांचे रहस्य समजून घेणाऱ्या, त्यांचा प्रचार करणाऱ्या त्या सर्व स्त्रिया ऋषिका नावाने प्रसिद्ध आहेत. आपण आज जुहू या ऋषिकेची माहिती घेऊया.

ऋषिका जुहू ब्रह्मवादिनी होती. ब्रह्मवादिनी म्हणजे उपनयन करणारी आणि अग्निहोत्र करणारी. वेदांचा अभ्यास करणारी आणि घरातील लोकांची निस्वार्थ सेवा आणि स्वेच्छेनं मिळालेल्या अन्नपाणी, पैशांनी जगणारी. ब्रह्मा + वादिनी = ब्रम्हे. ब्रम्हाला साक्षात आत्मतत्व म्हणतात. ब्रह्मतत्त्वाचे अध्ययन करू इच्छिणारी ब्रह्मवादिनी. तिचे उपनयन करून तिला वेदाध्ययन करता येत असे. खूप तपस्या करून ब्रम्हाचे ज्ञान रसिकांना पोहचवण्याचे काम ब्रह्मवादिनी करते.

ऋषिका आणि ब्रह्मदेव हे पती-पत्नी होते म्हणून तिला ब्रह्मजाया असेही म्हणतात. काही कारणाने ब्रह्मदेवाने तिचा त्याग केला पण ऋषिका जुहू अजिबात घाबरली किंवा विचलित झाली नाही. ती पतिव्रता होती, धर्मपरायण होती आणि म्हणून तिचा धर्मपरायण निर्णायक मंडलावर पूर्ण विश्वास होता. त्याकाळात पत्नीचा त्याग करणे हा मोठा अपराध मानला जात असे. अशा पतींना प्रायश्चित्त घ्यावे लागत असे. वायू, अग्नी, सूर्य, सोम आणि वरुण या देवतांनी ब्रह्मदेवाला प्रायश्चित्त दिले. सर्वात प्रथम सोम राजाने ब्रह्मदेवाला या पवित्र चारित्र्याच्या स्त्रीचा निसंकोचपणे स्वीकार करण्यास सांगितले. वरूण देवता आणि मित्र म्हणजे सूर्याने देखील त्यास अनुमोदन दिले. मग अग्नि देवतेने तिचा हात धरून तिला तिच्या पतीकडे सोपवले. सर्व देवांनी ब्रह्मदेवाला सांगितले तुझ्या पत्नीने खूप तपस्या केली आहे. त्यामुळे तिचे रूप अती उग्र झाले आहे. तिला शत्रू कधीच स्पर्श करू शकणार नाही. तिचे चारित्र्य शुद्ध आहे. ती पापी मुळीच नाही. ती तेजस्विनी आहे, निष्पाप आहे, निरपराध आहे, निर्दोष आहे. तिच्यावर अन्याय होता कामा नये. ब्रह्मदेवाला ते पटले आणि ऋषिका जुहूचा पत्नी म्हणून त्याने स्वीकार केला. पण ब्रह्मवादिनी असूनही ऋषिका जुहूला अन्यायाविरुद्ध लढावेच लागले.

*स्त्री जन्मा ही तुझी कहाणी*
*हृदयी अमृत, नयनी पाणी...*

बिइंग वुमन
Pune's only Fortnightly for Women
Follow us on :-

## आत्मनिर्भरता



**सावित्री जगदाळे, सातारा**
editorial@thebeingwoman.com

पहिल्यांदाच कांदा लावला. दोन वेळा हरभरा पेरला, तरी अवकाळी पावसाने गेला. मग तिथे कांदा लावला. बायका लावून कांद्याची रोपं लावली. पंधरा दिवसांनी बारीक-बारीक तण उगवले. तेव्हा अनुभवी शेजारीण म्हणाली, 'बारीक आहे तोवरच काढून घ्या. मी माळ्याच्या म्हातारीला पाठवून देते.' म्हातारी आली. तिला पाहूनच वाटलं ही कशी भांगलणार... दात सगळे पडल्यामुळं तोंडात जीभ हलत होती. हातापायांच्या काड्या. तिला काम सांगणंही नको वाटू लागलं. ती म्हणाली कुठं भांगलायचं? तिला शेत दाखवले. तिनं पटकन सुरूवात केली. कांद्यांच्या रोपांत अलवार बसून जमीन भुसभुशीत केली. बारीक तण काढले. उरकही भरपूर. तरण्या बायकासुद्धा एवढया भरभर काम करणार नाहीत. बुद्धी, स्मरणशक्ती तल्लख.

मला प्रश्न पडू लागले, 'काय खाल्लं असेल हिनं? ही एवढी निरोगी तरतरीत कशी?' एकटी राहते. बँकेत ठेव जमा आहे. स्वतःचा दवाखाना स्वतः करते. घरची स्वतःची कामेही. आधारकार्ड आहे. स्वयंभू, आत्मनिर्भर म्हणजे काय ते तिच्याकडे बघितले की कळत होते. आत्मनिर्भरता येण्यासाठी कष्टाबरोबरच स्वावलंबन तितकेच महत्त्वाचे असते.




## मकर संक्रमण



**लीना दामले (खगोलीना), पुणे**
editorial@thebeingwoman.com

### आकाशदर्शन

संक्रात हा आपला एकमेव भारतीय सण सूर्याच्या संक्रमणाशी निगडित आहे. इंग्लिश कॅलेंडरप्रमाणे बरोबर १४ जानेवारी याच दिवशी येणारा हा सण आहे. सूर्याने मकर राशीत प्रवेश केला म्हणजे आपण मकर संक्रमण झाले असे म्हणतो आणि हा सण साजरा करतो. सध्या १४ जानेवारी रोजी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. पण ही स्थिती तात्पुरती आहे. एकविसाव्या शतकाच्या अंतिम काळात १५ जानेवारी रोजी सूर्य मकर राशीत प्रवेश करू लागेल. अलीकडच्या काळात काही लीप वर्षात मकर संक्रमण १५ जानेवारी रोजी झालेले आहे.




मकर संक्रांतीचा मूळ उद्देश पूर्णतः निराळा होता. एकेकाळी सूर्याने मकर राशीत प्रवेश केला की उत्तरायणाला (winter solstice) प्रारंभ होत असे. त्यानंतर हळूहळू दिवस मोठा होत जात असे. त्याकाळी हा विशेष दिवस म्हणून साजरा करण्याची प्रथा पडली असावी. वर्तमान काळी २२ डिसेंबर रोजी उत्तरायणाला प्रारंभ होतो, पण त्यावेळी सूर्य धनु राशीत असतो. आजपासून किती वर्षांपूर्वी सूर्याने मकर राशीत प्रवेश केल्यावर उत्तरायणाला प्रारंभ होत असेल याचे एक ढोबळ गणित करता येईल.

पृथ्वी स्वतःभोवती तसेच सूर्याभोवती फिरते हे आपल्याला माहिती आहे. तिचा अक्ष २३.५ अंशांनी कललेला आहे हेही आपल्याला माहिती आहे. पण हा तिचा अक्षही स्थिर नाही, तोही फिरतो. त्याची एक फेरी पूर्ण व्हायला २६००० वर्षे लागतात. त्याला 'परांचन गती' म्हणतात. त्या गतीमुळे दर ७२ वर्षांनी 'वसंतसंपात' आणि 'उत्तरायण प्रारंभ' एका अंशातून मागे सरकतो. वर्तमानकाळी वास्तव वसंतसंपात आणि भारतीय मेषारंभ यामध्ये सुमारे २४ अंशांचे अंतर पडले आहे. अर्थात तेवढेच अंतर वर्तमान उत्तरायण प्रारंभ आणि प्राचीन उत्तरायण प्रारंभ त्यामध्ये पडले असणार. म्हणजेच २४ गुणिले बहात्तर बरोबर १७२८ वर्षांपूर्वी सूर्याने मकर राशीत प्रवेश केल्यानंतर उत्तरायणाला प्रारंभ होत असावा. आजपासून १७२८ वर्षांपूर्वी म्हणजे इसवी सन २८० च्या सुमाराला सूर्याने मकर राशीत प्रवेश केल्यानंतर उत्तरायणाला प्रारंभ होत असे.

हेच स्थूल गणित वर्तमान काळासाठी वापरले आणि दररोज सूर्य एका अंशातून पुढे सरकतो असे गृहीत धरले, तर २२ डिसेंबर अधिक २३ दिवसांनी म्हणजे १४ जानेवारी रोजी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो. अर्थात उत्तरायणाचा आरंभ आणि सूर्याचा मकर राशीत प्रवेश यांचा संबंध आता पार तुटला आहे. जर उत्तरायणाचा प्रारंभ साजरा करायचा असेल तर २२ डिसेंबर रोजी साजरा करणे उचित ठरेल.

सध्या वास्तव वसंतसंपात आणि भारतीय मेषारंभ यांच्यामध्ये असलेला २४ अंशांचा फरक हळूहळू वाढत जाईल. सध्या वसंतसंपात भारतीय मीन राशीच्या साधारण सहाव्या अंशावर आहे ही गोष्ट या ठिकाणी लक्षात ठेवली पाहिजे. आणखीन सुमारे ७२ वर्षांनी म्हणजे २०८० च्या सुमाराला वास्तव वसंतसंपात आणि भारतीय मेषारंभ यामधील फरक २५ अंश होईल आणि त्यानंतर मकर संक्रांत पुढे कित्येक वर्षे १५ जानेवारी रोजी होऊ लागेल.

*मकर संक्रमण नाही*
*म्हणा धनूर संक्रमण*
*प्रवेशतो सूर्य धनूत*
*न की मकर राशीत*
*उत्तरायण होते पौषात*
*आता न हो मार्गशिर्षात*
*विश्वात नसे काही स्थिर*
*धरेचा अक्षही अस्थिर*
*अक्ष दाखवी दिशा उत्तर*
*असे ध्रुवही अस्थिर*

## पुणेरी संक्रात

* १ ते ४ आमच्या इथे तिळगुळ देण्या-घेण्यास मनाई आहे
* कुलकर्णींकडे तिळगुळ घ्यायला आलेल्यांनी जोशींकडे चपला काढू नये
* पसरला का रे...?? गोडवा...
* तिळगुळ दिला खरा
  पण गोड किती बोलायचं
  हे आम्हीच ठरवतो
* गोड बोल... खोड मोड
* आम्हाला तिळगूळाची गरज नसते
* देता का घेऊ... गोडवा
* आम्हाला डायबिटीस आहे

**- चित्राली कुलकर्णी, पुणे**

## चाँद



आँगन में
अपने बैठी
थी मैं;
देख रही थी
ढलती शाम...
आसमान में तैर रहा था
काला पर्दा और पूरा चाँद!

घुंगराले बादलोंसे भरा पड़ा था
आसमान पूरा पूरा,
कभी उनके पीछे छुपता
कभी खुद पर्दा बनता चाँद!

खूब जानते हैं जनाब;
के हर अदा पे
कई दीवाने हैं उनके,
कभी हिलाल, कभी चौदवी

रोज रोज बेझिजक
करवटे बदलता चाँद!


सदियों से आफताब से
उधार ये ली हैं रोशनी
मगर सदियोंसे
खुद के रंग मिलाकर
धरती शीतल बनाता चाँद,

जब गिर पड़ा उसका एक
सुंदर सा टुकड़ा तालाब में
धुन्दला गयी मै कुछ देर,
मेरे यार की याद दिलाता चाँद

बदन पर उसने गूंद रखा हैं;
उसके किसी अपने का नाम
उसके अक्षर, उसकी भाषा
उसका भी तो होगा कोई अपना चाँद!

**- ऐश्वर्या खळदकर, पुणे**

**बिइंग वुमनमध्ये प्रसिद्धीसाठी आपले लिखाण येथे पाठवा :**
**editorial@thebeingwoman.com**
**(प्रसिद्धीबाबत संपादकिय मंडळाचा निर्णय अंतीम राहील.)**



Rahul Baviskar
Mob. No. : 9890 43 1611
9890 37 8038
RTO Services Available @ Pune, Bangalore, Indore, Aurangabad
- Driving License
- I D P
- Vehicle Transfer
- HP Cancellation / Endorse
- Vehicle Registration
- PUC & Vehicle Insurance

Karve Statue, Kothrud, Pune - 411038
e-mail : baviskarrahul789@gmail.com







# बिझंग वुमन

# SMART HOME MONTHLY PLANNER

## YEAR - 2022









| IMPORTANT NUMBERS | ELECTRICIAN | PLUMBER | CARPENTER | MESS | GEN. STORES |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| MONTHS | MILK | NEWS PAPER | TUTION | SCHOOL BUS | CAR WASH |
| NAME | | | | | |
| NUMBER | | | | | |
| JANUARY | | | | | |
| FEBRUARY | | | | | |
| MARCH | | | | | |
| APRIL | | | | | |
| MAY | | | | | |
| JUNE | | | | | |
| JULY | | | | | |
| AUGUST | | | | | |
| SEPTEMBER | | | | | |
| OCTOBER | | | | | |
| NOVEMBER | | | | | |
| DECEMBER | | | | | |

| DOCTOR | WATCHMAN | AMBULANCE | POLICE | SCHOOL | SOC. CHAIRMAN |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| COOK | MAID | ELEC. BILL | MOBILE/WIFI | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |



















**Regd. Newspaper - RNI No. MAHMAR/2019/78753**
(Decl. No. SDM/Pune City/SR/30/2020)
Licence to post without pre-payment of postage No.
Postal Reg. No.
Publication Date : 16/12/2021
Posting 'Every Fortnight' at

To,

Postal Stamp

If undelivered, please return to -
ABSOLUTE MEDIA SOLUTIONS,
A-24, Sadgurukripa Bldg, Gopinath Nagar, Kothrud, Pune 411038, INDIA
Contact : 9850944219

'बिइंग वुमन' हे पाक्षिक मालक, प्रकाशक व मुद्रक रोहिणी अरुण वांजपे यांनी एकविरा पब्लिसिटी, ए १२, निखिल पार्क 'सी' सोसा., माणिकबाग, सिंहगड रोड, पुणे - ४११०५१ येथे छापून फ्लॅट नं. सी ११, संगिता सीएचएस, ताडीवाला रोड, पुणे - ४११००१ येथून प्रसिध्द केले. संपादक - रोहिणी अरुण वांजपे (प्रसिध्द केलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही).
'Being Woman' Fortnightly publication is owned, Printed and Published by Rohini Arun Wanjpe, printed at Ekvira Publicity, A 12, Nikhil Park C Soc., Manikbaug, Sinhgad Road, Pune - 411051 and published at Flat No. C11, Sangita CHS, Tadiwala Road, Pune - 411001. Editor - Rohini Arun Wanjpe.



**स्वाती यादव, पुणे**
editorial@thebeingwoman.com

# गोडवा हिंदीचा

मानवी जीवनाचा भाषा हा अविभाज्य घटक आहे. भावभावनांचं, विचारांचं आविष्करण करण्याचं महत्त्वपूर्ण माध्यम आणि मूलभूत गरजही आहे.

संस्कृतीचा विकास भाषेच्या माध्यमातून समजून येतो. भाषा हा मानवी संस्कृतीचा पाया असतो. आचार-विचार, ज्ञान, संस्कार, वारसा-परंपरा भाषेच्या माध्यमातूनच पुढच्या पिढीकडे सुपूर्द केल्या जातात.



इसवीसन पूर्व १५०० ते इसवीसन पूर्व ५०० या काळात भारतात संस्कृत ही बोलीभाषा होती. मात्र इसवीसन ५०० ते ६०० च्या आधी भगवान बुद्ध व महावीर यांच्या काळात या भाषेचे स्थान पाली व प्राकृत या भाषांनी घेतले. मगध प्रांतात ही भाषा उत्पन्न झालेली असल्याने हिला 'मागधी' असेही म्हणत. पाली आणि प्राकृत भाषेत परिवर्तन होत होत तिला 'अपभ्रंश' असे नाव मिळाले. हिलाच 'देशीभाषा' असे म्हणत. ही भाषा ८०० ते १३०० पर्यंत जीवित होती. ही भाषा म्हणजेच वर्तमान हिंदीची जननी होय. अपभ्रंश भाषेत पर्शियन व तुर्की शब्दांचा भरणा करून हिंदी (जिला हिंदवी असेही म्हणतात) ही भाषा निर्माण झाली. खिलजींच्या शासन काळात अमीर खुसरोने (काळ १२५० ते १३२५) अपभ्रंश भाषेत पर्शियन व तुर्की शब्दांचा भरणा करून हिंदी निर्माण केली. अमीर खुसरो यांना हिंदी काव्याचा जनक, उर्दू अदब आणि शायरीचा जनक मानले जाते.

पश्चिमी हिंदी, राजस्थानी, बिहारी, पूर्वी हिंदी आणि पहाडी अशा पाच उप भाषांमध्ये हिंदी बोलली जाते. तसेच क्षेत्रीय भाषा ब्रजभाषा, कन्नड, कनौजी, छत्तीसगढी, कुमावुनी, खडी बोली, जयपुरी, भोजपुरी, अवधी, गढवाली या सर्वच भाषांना सोयीने हिंदी म्हटले जाते.

मध्ययुगीन काळात हिंदी भाषा खूपच विकसीत झाली. संत कबीर, सूरदास, तुलसीदास, मीराबाई, मलिक मुहम्मद, जायसी बोथा, आलम ठाकूर, रहीम अशा हिंदी कवींनी हिंदी साहित्याचं दालन खूपच विस्तृत केलेलं आहे.

सर्वच भक्त कवींनी आपलं काव्य सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी हिंदी भाषेचाच आसरा घेतला. स्वतंत्रता संग्रामातही हिंदी भाषेचे महत्व अनन्यसाधारण असं होतं. हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे.

विश्व हिंदी दिवस १० जानेवारीला साजरा केला जातो. हिंदी ही जगभरातली सर्वात जास्त बोलली जाणारी चौथ्या क्रमांकाची भाषा आहे. हिंदी सहज एकमेकांच्या हृदयाशी नातं जोडणारी भाषा असल्याने तिला मनाची भाषा, हृदयाची भाषा असंही म्हटलं जातं.

सर्वव्यापकता, साहित्य, सोपेपणा आणि वैज्ञानिकता हे गुण हिंदी भाषेमध्ये असल्यामुळे हिंदी ही भारताची राष्ट्रभाषा आहे. हिंदी भाषेची लिपी देवनागरी हीच आहे. मराठी भाषेची लिपीसुद्धा देवनागरी हीच असल्याने मराठी माणसाला हिंदी जवळची आहेच.

हिंदी भाषेतील सुमित्रानंदन पंत, रामदास, रामधारीसिंह दिनकर, जयशंकर प्रसाद, मैथिलीशरण गुप्त असे लेखक तथा सचिदानंद सेन, सूर्यकांत त्रिपाठी निराला, महादेवी वर्मा, नागार्जुन, रामवृक्ष बेनीपुरी अशा अनेक साहित्यिकांनी हिंदी भाषेत आपल्या रचना केल्या आहेत.

खुसरोनंतर ४०० वर्षांनी हिंदवी भाषेला अरबी व फारसी भाषेचा मुलामा देऊन रेख्ता (उर्दू) ही भाषा वाली दकनी यांनी तयार केली. ते औरंगाबाद, महाराष्ट्राचे. इ.स.१७०० च्या सुमारास प्रथम दिल्लीला गेले. दिल्लीत तेव्हा पर्शियन भाषेचे प्रभुत्त्व होते. गुलशन यांनी वलीला हिंदवी भाषेत पर्शियन शब्द, उपमा-अलंकारांचा भरणा करण्यास सांगितले. (इ.स. १६६८-१७४४)

प्रत्येक भाषेची एक वेगळी प्रकृती असते. जशी मराठी सडेतोड, रांगडी आहे, हिंदी भाषेचा गोडवाच और आहे, तशी उर्दू भाषेची नजाकत काही वेगळीच आहे. तिची अदब, तिची अदा मनाला भुरळ घालते. उर्दू या शब्दाचा कोशातला अर्थ छावणी लष्कर किंवा पडाव असा आहे. काय गंमत आहे ना! उर्दूची लिपी मात्र वेगळी आहे.

भाषा हे ऐकून शिकण्याचे साधन असल्याने आपल्या घरातली लहान मुले हल्ली हिंदी, इंग्रजी आणि मराठी यांचं मिश्रण असलेली भाषा बोलतात. कारण दूरदर्शन आणि इतर वाहिन्यांमुळे पडलेला इतर भाषांचा प्रभाव. पण लहान वयातच असा प्रभाव दिसतो. वाढत्या वयानुसार भाषा शुद्ध बोलण्याकडे त्यांचा कल वाढतो.

सर्वांना नव वर्षाच्या आणि विश्व हिंदी दिनाच्या शुभेच्छा!







